26 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात नवमतदारांना इपिक कार्डचे वाटप करताना शंकरराव जाधव. शेजारी अश्‍विनी जिरंगे, शीतल मुळे-भामरे, भगवान कांबळे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रतिज्ञा घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे, अभय जायभाये, डॉ. प्रल्हाद माने.

# नवभारत घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा

## शंकरराव जाधव : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त ठिकठिकाणी कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : ''नवभारत घडविण्यासाठी मतदारांसह, नवमतदारांनी पुढाकार घ्यावा,'' असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शंकरराव जाधव यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील ताराराणी सभागृहात १२ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी अश्‍विनी जिरंगे व करवीर तहसिलदार शीतल मुळे-भामरे उपस्थित होते.

जाधव म्हणाले, ''मतदान करणे हा केवळ मतदारांचा उत्सव नाही तर राज्यघटनेवर विश्वास असणाऱ्या प्रत्येक सुजाण नागरिकांचा पर्यायाने लोकशाहीचा महोत्सव आहे. अमिषाला बळी न पडता उत्स्फूर्त व सदसदविवेकबुध्दीने मतदान करावे.''

उपजिल्हा निवडणूक अधिकारी कांबळे यांनी प्रास्ताविकात गेल्या वर्षी सुमारे ८८ हजार १०६ नवमतदारांनी नोंदणी केल्याची माहिती दिली. उपस्थित नवमतदारांना सामूहिक शपथ दिली. डॉ. आझाद नायकवडी यांनी मतदानाविषयी प्रबोधनात्मक पोवाडा सादर केला.

दिव्यांग मतदार व तृतीयपंथी मतदारांना इपिक कार्ड, निबंध स्पर्धेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तसेच उत्कृष्ट पर्यवेक्षक, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना गौरविण्यात आले. प्रदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शीतल मुळे-भामरे यांनी आभार मानले.

**समवयस्कांना प्रोत्साहित करा : कुलगुरू**

प्रत्येक प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनीने मतदार यादीत नाव नोंदवून समवयस्कांना त्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आजादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत आज १२ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त आयोजित 'सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपूर्ण निवडणुका' उपक्रमात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, ''केवळ नाव नोंदविण्याने भागत नाही. मतदान करण्यासही युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. राज्य निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणात जनजागृतीची मोहीम हाती घेतली आहे.'' यावेळी नोडल अधिकारी डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रतिज्ञा दिली. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

**कृषी महाविद्यालयात ऑनलाईन साजरा**

उजळाईवाडी : कृषी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय मतदार दिवस ऑनलाईन साजरा झाला. तहसिलदार डॉ. अपर्णा धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. मतदार नोंदणीची माहिती दिली. डॉ. मनिषा मोटे यांनी मतदार दिवसाचे महत्त्व सांगितले. सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम हुले यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. मोहन जाधव यांनी आभार मानले.

**पाटणे हायस्कूलमध्ये मतदार दिन**

तवनाप्पा पाटणे हायस्कूलमध्ये मतदार दिन साजरा झाला. मुख्याध्यापिका व्ही. एल. डेळेकर अध्यक्षस्थानी होत्या. पी. के. चव्हाण यांनी मतदार दिनाची माहिती सांगितली. एस. व्ही. हिरेमठ यांनी मतदार दिनाची प्रतिज्ञा दिली. पर्यवेक्षक सतीश भोसले, जिमखाना प्रमुख आर. एस. मांडरे आदी उपस्थित होते. डी. सी. पाटील यांनी आभार मानले.

26 JAN 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदार यादीत नाव नोंदवा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रत्येक प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनीने मतदार यादीत आपले नाव नोंदवले पाहिजे, त्याचप्रमाणे आपल्या समवयस्कांना त्यासाठी प्रोत्साहितही केले पाहिजे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आजादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत मंगळवारी १२ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त 'सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपूर्ण निवडणुका' हा उपक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी उपस्थित निवडणूक साक्षरता मंडळ सदस्य विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकशाहीचे पवित्र कर्तव्य म्हणून देशाचा विकास, लोकशाहीचे संवर्धन यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करायला हवे. राज्य निवडणूक आयोगाचीदेखील भूमिका आहे. त्यासाठी आयोगाने जनजागृतीची मोहीम हाती घेतली आहे. त्याला प्रतिसाद म्हणून युवकांनी मतदार नोंदणी मोहिमेत सहभागी होण्याची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी नोडल अधिकारी डॉ. प्रल्हाद माने यांनी उपस्थितांना मतदार दिवस प्रतिज्ञा दिली. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

लोकमत

# राज्यातील महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून उघडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांमधील वर्ग १ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. यासंदर्भातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्यता दिल्यानंतर विभागाने आदेश काढला आहे.

सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, समूह विद्यापीठे, तंत्रनिकेतने व अन्य शैक्षणिक संस्थांमधील वर्ग १ फेब्रुवारीपासून ऑफलाईन सुरू होतील. ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर हे वर्ग १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय विभागाने घेतला होता. तथापि, राज्यातील शाळा २४ जानेवारीपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी महाविद्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव (पान १० वर)

राज्यातील महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून उघडणार

(पान १ वरुन) मुख्यमंत्र्यांकडे पाठविला होता. विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय संबंधित विद्यापीठांनी स्थानिक प्राधिकरणांशी चर्चा करूनच घ्यावा, असे आदेशात म्हटले आहे. विद्यापीठे, महाविद्यालयांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत संबंधित विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे विभागाने स्पष्ट केले आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयांनी हेल्पलाइनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थित पार पाडण्याच्यादृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाइन क्रमांक आदी माहिती दिली जाईल.

**वसतिगृहे टप्प्या-टप्प्याने सुरू**

विद्यार्थी वसतिगृहे टप्प्या-टप्प्याने सुरू करण्याबाबत संबंधित विद्यापीठ, उच्च शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण संचालक यांनी आढावा घ्यावा. स्थानिक प्राधिकरणांशी चर्चा करून त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

26 JAN 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शनिवारपासून आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २९ ते ३१ जानेवारी या कालावधीत आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन केले आहे, अशी माहिती डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' या शृंखलेतील 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव : २०२२' या मध्यवर्ती विषयावर हा परिसंवाद होणार आहे. शनिवार, दि. २९ रोजी सकाळी ११ वाजता परिसंवादाचे उद्घाटन होईल. याप्रसंगी इंटरनॅशनल अफेअर्स, आरएसयूएच, मॉस्कोच्या प्र. कुलगुरू प्रा. वेरा जबोत्किना, रशियाचे भारतातील राजदूत निकलाई कुदाशेव, भारताचे रशियातील राजदूत महनीय पवन कपूर व रशियन हाऊस इन मुंबई संचालक डॉ. इलेना रेमीजवा सदिच्छा संदेश देण्यासाठी उपस्थित असतील. या सत्रात ज्येष्ठ इतिहासकार प्रा. रोमिला थापर यांचे उद्घाटनपर व्याख्यान, तर विख्यात भाषातज्ज्ञ प्रा. गणेश देवी बीजभाषण करतील. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. डी. दयालन विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील, तर कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील.

या परिसंवादात देश-विदेशातील प्रख्यात विचारवंत, अभ्यासक दक्षिण आशियाशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. दि. ३१ जानेवारी रोजी ज्येष्ठ पत्रकार व राज्यसभा सदस्य कुमार केतकर समारोपाचे भाषण करतील. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील समारोप सत्राचे अध्यक्ष असतील.

पुण्यनगरी

# चौथे धम्मविचार साहित्य, संस्कृती संमेलन रविवारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे एकदिवसीय चौथे धम्मविचार साहित्य, संस्कृती संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन राजर्षी शाहू स्मारक भवनच्या मुख्य सभागृहात रविवार, दि. ३० जानेवारी रोजी सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत होणार आहे. संमेलनाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून, कवी व लेखक डॉ. सतीशकुमार पाटील हे संमेलनाध्यक्ष असणार आहेत, अशी माहिती ॲड. करुणा मिणचेकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

पाच सत्रांमध्ये होणाऱ्या या संमेलनास माजी संमेलनाध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण अडसूळ, स्वागताध्यक्ष चंद्रकांत सावंत, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सुरेश शेळके आदी उपस्थित राहणार आहेत. दुसरे सत्र पुरस्कार वितरणाचे असून, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या कॉ. सुशीला यादव यांना धम्मदीप जीवन गौरव पुरस्कार धम्म चळवळीच्या ज्येष्ठ अभ्यासिका विजया कांबळे यांच्या हस्ते दिला जाणार आहे.

तिसऱ्या सत्रात कवी संमेलन असून या संमेलनाचे अध्यक्ष कवी व लेखक वसंत भागवत आहेत. चौथ्या सत्रात कोरोनानंतरचे जग आणि धम्म चळवळ या विषयावर परिसंवाद होणार असून, या परिसंवादाच्या अध्यक्षा डॉ. दीपा श्रावस्ती, तर डॉ. सोमनाथ कदम, डॉ. कपिल राजहंस, संतोष गमरे आदी विचार मांडणार आहेत. पाचव्या सत्रात निळ्या पाखरांची माय हा विश्वनाथ कांबळे निर्मित प्रबोधनात्मक भीम बुद्ध गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

पत्रकार परिषदेस चंद्रकांत सावंत, दयानंद ठाणेकर, विमल पोखर्णीकर, विश्वनाथ कांबळे, बाळासाहेब डोणे, नारायण कांबळे, प्रा. शोभा चाळके, चंद्रनील सावंत उपस्थित होते.

पुण्यनगरी

# कोल्हापुरात आज मराठी काव्य संमेलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, गट कोल्हापूर यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी काव्य संमेलनाचे आयोजन केले आहे. बुधवार, दि. २६ रोजी राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे सकाळी ११ वाजता ज्येष्ठ कवी खलील मोमीन यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होणार आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे हे करणार आहेत. तसेच कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा पाटील, गुणवंत कामगार शिवाजी चौगुले व बाबासो ढेरे हेही यावेळी उपस्थित असणार आहेत. यावेळी कवी कबीर, मंदार पाटील (कवी चैत्र), दस्तगीर नदाफ, संचित कांबळे, प्रा. प्रकाश नाईक, वैशाली पाटील, विक्रम राजवर्धन, रावण समुद्रे, साताप्पा सुतार, प्रताप घेवडे, सचिन कांबळे, अमोल महापुरे, निशांत शिंदे आदी सहभागी होणार आहेत. कवी व काव्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्र संचालक संघसेन जगतकर यांनी केले आहे.

## कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजन

सकाळ

# चौथे धम्मविचार संमेलन रविवारी

कोल्हापूर, ता. २५ : धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे एकदिवसीय चौथे धम्मविचार साहित्य व संस्कृती संमेलन शाहू स्मारक भवनमध्ये रविवारी (ता. ३०) होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून लेखक डॉ. सतीशकुमार पाटील संमेलनाध्यक्ष आहेत.

सकाळी दहा ते रात्री आठ वेळेमध्ये पाच सत्रात होणाऱ्या संमेलनास माजी संमेलनाध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण अडसूळ, स्वागताध्यक्ष चंद्रकांत सावंत, प्रा. डॉ. सुरेश शेळके आदी उपस्थित राहतील. दुसऱ्या सत्रात सुशीला यादव यांना धम्मदीप जीवन गौरव पुरस्कार हा विजया कांबळे यांच्या हस्ते दिला जाईल. बाबासाहेब माने, मोहन मिणचेकर उपस्थित राहतील. तिसऱ्या सत्रात कवी संमेलनात कवी वसंत भागवत, शेषराव नेवारे, रंजना सानप, उद्धव पाटील, प्रा. सुचित्रा गायकवाड, प्रकाश शिंदे, आराधना गुरव, सुजीत कदम, सागर भजनावळे, कल्याण श्रावस्ती, प्रा. सागर कांबळे, जानराव यु. एफ. हे कविता सादर करतील.

चौथ्या सत्रात 'कोरोनानंतरचे जग', 'धम्म चळवळ' यावर परिसंवाद होईल. डॉ. दीपा श्रावस्ती अध्यक्ष तर डॉ. सोमनाथ कदम, डॉ. कपिल राजहंस, संतोष गमरे विचार मांडतील. सायंकाळी सहा वाजता 'निळ्या पाखरांची माय' हा विश्वनाथ कांबळे निर्मित भिम बुद्ध गीतांचा कार्यक्रम होईल. अनिल म्हमाने, दयानंद ठाणेकर, सुरेश केसरकर, ॲड. अकबर मकानदार, तात्यासाहेब कांबळे, अमित मेधावी, प्रा. शोभा चाळके, डॉ. स्वप्निल बुचडे, डॉ. अविनाश वर्धन, विमल पोखर्णीकर, बाळासाहेब डोणे, नारायण कांबळे, ॲड. अधिक चाळके, शक्ती कश्यप, शांतीलाल कांबळे, चंद्रनील सावंत यांनी संमेलनाचे आयोजन केले आहे. कोल्हापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टच्या अध्यक्षा ॲड. करुणा मिणचेकर यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात लोकशाही पंधरवड्याचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत २८ जानेवारी ते १० फेब्रुवारी कालावधीत लोकशाही पंधरवड्याचे आयोजन केले आहे. यावेळी विविध कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी दिली.

डॉ. माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकशाही पंधरवडा हा, विविध अधिविभागांच्या सहकार्याने विद्यापीठात साजरा केला जाणार आहे. शुक्रवार २८ जानेवारी रोजी निबंध स्पर्धा राज्यशास्त्र अधिविभागात होणार आहेत. रविवार २९ जानेवारी रोजी माईम स्पर्धा राष्ट्रीय सेवा योजना विभागात होणार आहेत. मंगळवार ३१ जानेवारी रोजी लघुपट स्पर्धा मास कम्युनिकेशन विभागात होणार आहेत.



## निबंध, गायन, वक्तृत्वसह अन्य स्पर्धा होणार

२ फेब्रुवारी रोजी चित्रकला संगीत व नाट्यशास्त्र विभागात होणार आहेत. ४ फेब्रुवारी रोजी वक्तृत्व स्पर्धा समाजशास्त्र अधिविभागात होणार आहेत. ७ फेब्रुवारी रोजी घोषवाक्य स्पर्धा मराठी अधिविभागात होणार आहेत. १० फेब्रुवारी रोजी गायन राष्ट्रीय येवा योजना योजना विभागात होणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी संबंधित अधिविभागांशी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. माने यांनी केले आहे.

तरुण भारत

# १ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू

**मुंबई :** राज्यातील शाळा सोमवारपासून सुरू झाल्यानंतर आता राज्यातील महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी याबाबतची माहिती ट्विट करून दिली आहे. १ फेब्रुवारी २०२२ पासून राज्यातील महाविद्यालये ऑफलाईन सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र विद्यार्थ्यांनी दोन्ही डोस घेतलेले असणे आवश्यक आहे.